# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/02/2024 (गुरूवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ४५,९९,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २१/०२/२०२४ चे ०४.३० वा. ते ०४.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.— ४०/सि डि— ३९२८ चा चालक गाडी मध्ये अवैध्यरित्या विनापरवाना रेती लोड करुन वाहुतक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा रामटेक येथे नाकाबंदी करून आरोपी नामे— टिकाराम उर्फ संतोश लेहाराम नागवंशी वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ पिपडखुडा त. वरूड जि. अमरावती हे व ट्रक क्र. एम. एच. सि क्यु १८०४ चा चालक राजेश प्रल्हाद धुळे वय ३७ वर्ष रा. हनंतखेड वार्ड क ०३ ता अचलपुर जि. अमरावती हे दोन्ही मालकाचे सांगण्यावरून तुमसर रोडने नागपुरकडे अवैधरित्या विनापरवाना रेती वाहतूक करतांनी मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून १२ चक्का ट्रक क्र. एम एच ४० सि डि ३९२८ किंमती २०,००,०००/— रू व अंदाजे १५ ब्रास रेती ३,०००/— रू प्रती ब्रास प्रमाणे ४५,०००/— रू असा एकूण २०,४५,०००/— रू चा माल व १४ चक्का ट्रक क्र. एम एच सि क्यु १८०४ किंमती २५,००,०००/— रू व अंदाजे १८ ब्रास रेती ३,०००/— रू प्रती ब्रास प्रमाणे ५४,०००/— रू. असा एकुण २५,५४,०००/— रू असा दोन्ही गाडी व मालाचे किंमती असा एकुण ४५,९९,०००/— रू. चा मुद्देमाल अवैदयरित्या विनापरवाना मालकाचा सांगण्यावरून वाहतुक करीत असतांनी मिळुण आल्याने **आरोपी नामे—१) राजेश प्रल्हाद धुळे वय ३७ वर्ष रा. हनंतखेड वार्ड क्र. ०३ ता. अचलपुर जि. अमरावती २) संतोष लेहाराम नागवंशी वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ पिपडखुडा त. वरूड जि. अमरावती ३) कुणाल नामदेवराव रा. जरूड ता वरूड जि अमरावती ४) शेख फैयाज शेख निसार, रा. जरूड ता. वरूड जि. अमरावती** यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे अप क्र. १२५/२४ कलम ३७९, १०९ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण, खनिज अधि. ३ सार्वजनिक मालमत्ता दस्तऐवज अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार प्रशांत काळे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोलीस हवालदार अमोल इंगोले, पोलीस नायक प्रफुल रंधई, मंगेश सोनटक्के, पोलीस अंमलदार शरद गिते, धिरज खंते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर